श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

वर्ष-७, अंक-११ | नोव्हेंबर-२०१९ | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने ८

## शास्त्रीय सल्लागार समिती (Scientific Advisory Committee )



*शास्त्रीय सल्लागार समिती सदस्य : डॉ. श्रीपाद बाणवली, डॉ. सुनील नाडकर्णी, प्रो. बी. रवी, श्री. विकासराव वालावलकर, डॉ. टी. रामासामी, श्री अशोक रघुनाथ जोशी, डॉ. अनिल काकोडकर, डॉ. रिटा मुल्हेरकर, डॉ. अरविंद नातू, श्री. जयंतकुमार बांठिया, डॉ. सुवर्णा पाटील आणि प्रा. चंद्रशेखर गर्दे*

दि. १२.१०.२०१९ रोजी भ.क.ल.वालावलकर रुरल मेडिकल कॉलेजमध्ये Scientific Advisory Committee (SAC) ची बैठक घेण्यात आली होती. या बैठकीमध्ये आगामी विविध संशोधन प्रकल्प आणि त्या संबधित वेगवेगळ्या विषयांवर चर्चा करण्यात आली. तसेच सध्या चालू असलेल्या संशोधन प्रकल्पांवरही चर्चा करण्यात आली. पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर, पद्मभूषण डॉ. टी. रामासामी व इतर मान्यवरांचे मोलांचे मार्गदर्शन लाभले.ज्येष्ठ वैज्ञानिक डॉ. अरविंद नातू हेही या समितीत सहभागी झाले असून यापुढे त्यांच्याही मार्गदर्शनाचा लाभ संस्थेला होणार आहे.



*शास्त्रीय सल्लागार समिती - बैठक सुरू असताना*

# प्राथमिक आरोग्य कर्मचारी परिचारिकांची प्रशिक्षण कार्यशाळा



*डॉ. प्रतिभा पाटील आणि डॉ. अमेय ओक यांचा सत्कार करताना डॉ. सुवर्णा पाटील*

महाराष्ट्र सरकार (आरोग्य सेवा संचालनालय) संपूर्ण महाराष्ट्रात लोकसंख्येवर आधारित रोग नियंत्रण आणि प्रतिबंध यासाठी तपासणी कार्यक्रम राबवीत आहे. या कार्यक्रमात समुदाय स्तरावर गर्भाशय कर्करोगाच्या तपासणीसाठी, व्हीआयए/विली तंत्राची शिफारस केली जाते. हे तंत्र योग्यरीत्या हाताळण्यासाठी प्रशिक्षण घेणे आवश्यक असते. म्हणून बी.के.एल. वालावलकर रुग्णालयात प्राथमिक आरोग्य कर्मचारी परिचारिकांची प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. १० दिवसांच्या या कार्यशाळेसाठी रायगड जिल्ह्यातून एकूण २३ कर्मचारी परिचारिकांची पहिली तुकडी दि. ९ ऑक्टोबर ते १९ ऑक्टोबर २०१९ पर्यंत सहभागी झाली होती. या प्रशिक्षण कार्यक्रमाला टाटा मेमोरियल हॉस्पिटलचे डॉ. अमेय ओक आणि डॉ. प्रतिभा पाटील, तसेच अशोक पाटील, परिचारिका श्रीमती रूपा भावसार, श्रीमती दर्शना राणे आदी प्रतिबंधक विभागाच्या मान्यवरांतर्फे प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात सगळ्यांनी सक्रिय सहभाग घेतला होता.

# जागतिक मानसिक आरोग्य दिन

जागतिक मानसिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून भ.क.ल. वालावलकर रुग्णालयातील मेडिकल कॉलेज व डिपार्टमेंट ऑफ सायकलॉजिकल हेल्थ आणि बिहेविअरल सायन्स यांच्यामार्फत पोस्टर मेकिंग, कविता, प्रश्नोत्तरे, रोल प्ले इ. स्पर्धा घेण्यात आल्या. या वर्षी 'आत्महत्या रोखण्यासाठी एकत्र काम करणे' हा विषय होता. त्यात नर्सिंग कॉलेज, कॉलेज ऑफ ॲडव्हान्स स्टडीज आणि बीपीएमटीच्या विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. या कार्यक्रमाला मानसोपचार तज्ज्ञ डॉ. श्रुतिता कोतकुंडे, डॉ. संयोगिता नाडकर्णी, डॉ.रामसिंग व डॉ. श्रीकृष्ण पेवेकर उपस्थित होते.



*डॉ. संयोगिता नाडकर्णी आपले विचार व्यक्त करताना*

# सेवांकुर (कोकण प्रांत)




*'सेवांकुर'चे डॉक्टर्स आणि वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थी*

'सेवांकुर' ही संस्था विद्यार्थ्यांच्या अंतर्गत आणि बाह्य वाढीवर कार्य करते आणि त्यातून राष्ट्रनिर्मितीसाठी सामाजिकरीत्या जबाबदार डॉक्टरांचे संघटन तयार होते. दि. १७.१०.२०१९ रोजी 'सेवांकुर, मुंबई'च्या टीमने भ.क.ल. वालावलकर रुग्णालयाला भेट देऊन वैद्यकीय विद्यार्थ्यांसमोर 'सेवांकुर' संस्थेमार्फत चालणाऱ्या विविध प्रकल्पांची माहिती दिली आणि या सामाजिक उपक्रमात सहभागी होण्यासाठी आवाहन केले. डॉ. विशाल झा (नानावटी रुग्णालय, मुंबई), डॉ. रोहित गुप्ता(सेंट जार्ज रुग्णालय, मुंबई), डॉ. शुभम सिंगतकर(तेरणा रुग्णालय, नवी मुंबई), डॉ. सिद्धी चिंतेवार (एम. जी. एम. रुग्णालय, नवी मुंबई) या 'सेवांकुर'च्या टिमने रुग्णालयाच्या सामाजिक उपक्रमाची ही प्रशंसा केली.

# 'वुमेन्स वेल बिइंग कॅम्प'



*'वुमेन्स वेल बिइंग कॅम्प' - उद्घाटन समारंभ*

नवरात्र हा देवीचा म्हणजेच शक्तीचा सण म्हणून साजरा केला जातो. आई दुर्गेच्या विविध रूपांचे पूजन होते. त्यातीलच एक रूप म्हणजे स्त्री जी नि:स्वार्थपणे कुटुंबासाठी काम करत असते. त्या रूपाचा आदर म्हणून फिनोलेक्स, मुकुल माधव फाउंडेशन आणि भ.क.ल. वालावलकर रुग्णालय यांनी 'वुमेन्स वेल बिइंग कॅम्प' या महोत्सवाचे आयोजन केले होते. दि. ९ ऑक्टोबर ते दि. २३ ऑक्टोबर २०१९ पर्यत एका शिबिराचे आयोजन करून ५०० महिलांची तपासणी करण्यात आली. सर्वसाधारणपणे ज्यांना सुमारे २५०० ते ३००० रु. खर्च येतो अशा कर्करोग निदानासाठीच्या (गर्भाशय मुखाचा, स्तनाचा कर्करोग) तपासण्या फक्त १०० रुपयात करण्यात आल्या.

# वालावलकर रुग्णालयात भोंडला



किशोरवयीन मुलींसाठी भोंडल्याचे आयोजन

दि. ४ ऑक्टोबर २०१९ रोजी वालावलकर रुग्णालयात भोंडला हा कार्यक्रम किशोरवयीन मुलींसाठी आयोजित करण्यात आला होता. त्यासाठी कालुस्ते व कोकरे गावातील एकूण ७४ मुली सहभागी झाल्या होत्या. यात किशोर वयात होणारे शारीरिक आणि मानसिक बदल तसेच करिअर विषयक मार्गदर्शन करण्यात आले. भोंडला पारंपरिक रीतीने साजरा करण्यात आला.

# 'दिवाळी डिलाईट' डेरवण शाळेचा उल्लेखनीय उपक्रम

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित इंग्रजी माध्यमाची शाळा डेरवण येथे 'यंग आंत्रप्रेन्यर्स क्लब' अंतर्गत शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता विकसित व्हावी या हेतूने प्रतिवर्षाप्रमाणे 'दिवाळी डिलाईट' या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. पणत्या सुशोभिकरण, सुगंधी उटणे, मेणबत्ती, गिफ्ट बॅग्ज उत्पादन व विक्री या उपक्रमांचा समावेश असलेल्या या कार्यशाळेत इ. ६ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

कार्यशाळेत विविध आकाराच्या व प्रकारांच्या पणत्यांना आकर्षक रंगांनी रंगवून त्यावर कुंदन, मणी, काचा, रंगीबेरंगी टीकल्या यांचा वापर करून विद्यार्थ्यांनी पणत्यांचे सुशोभिकरण केले. मेणापासून नानाविध फळे, फुले, भौमितिक आकार, रोझ पिलर्स, रोझ बॉल्स, फ्लोटिंग कॅन्डल्स, टी लाईट्स अशा मेणबत्त्यांची निर्मिती केली. तसेच जेलवॅक्स, काचेचे बाऊल्स, ग्लास यांचा वापर करून विद्यार्थ्यांनी पारदर्शक मेणबत्त्या साकारल्या. अनेक रंग, रंगीत रांगोळी, डाळी, मणी, कडधान्ये, आकर्षक टिकल्या, शंख शिंपले अशा वस्तूंच्या साहाय्याने सुबक सुवासिक मेणबत्त्या बनविण्याचा आनंद व आत्मविश्वास विद्यार्थ्यांनी अनुभवला.

त्वचेस उपयुक्त असलेल्या वनौषधी व सुंगधी चूर्णाचा वापर करून विद्यार्थ्यांनी सुवासिक व उच्च प्रतीच्या आयुर्वेदिक उटण्याची निर्मिती केली. सर्वच औषधी चूर्णाचे योग्य प्रमाणानुसार वजन करणे, त्याचे एकत्रित मिश्रण करणे, अचूक वजन करून आकर्षक पद्धतीने पॅकिंग करणे अशा सर्वच क्रिया विद्यार्थ्यांनी सफाईदारपणे पार पाडल्या. मार्बल प्रिंटिंगचा वापर करून अत्यंत सुंदर, आकर्षक व टिकाऊ अशा कागदापासून निर्मित इकोफ्रेंडली गिफ्ट बॅग्जची निर्मितीदेखील या कार्यशाळेत करण्यात आली.



कागदी पिशव्या बनविण्याचे प्रशिक्षण




रंगीत पणत्या बनविताना रंगलेले विद्यार्थी





कार्यशाळेत विविध वस्तू तयार करत असतांना विद्यार्थ्यांची एकाग्रता, सांघिकभावना, सर्जनशीलता, क्रियाशीलता, कार्यकुशलता अशी विविध कौशल्ये विकसित झाली. या कार्यशाळेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या योगदानाबद्दल ठरावीक रक्कम शाळेतर्फे त्यांच्या बँक खात्यात जमा करून विद्यार्थ्यांना स्वकमाईचा आनंद दिला जातो.

## डेरवण शाळेत “Water Project” व “Language Day” उत्साहात साजरा









श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट इंग्लिश मिडीयम स्कूल, डेरवण येथे पूर्व प्राथमिक शाळेमध्ये Water Project व “Language Day” हे उपक्रम उत्साहात साजरे करण्यात आले.

Water Project मध्ये नर्सरीच्या मुलांनी जलचर प्राण्यांची चित्रांद्वारे ओळख करून दिली. ज्युनिअर के.जी.च्या मुलांनी पाण्याचे विविध उपयोग हे कृतीद्वारे सांगितले. सिनिअर के.जी.च्या मुलांनी पाण्याच्या स्त्रोतांची माहिती समुद्र, नदी, तलाव आणि विहीर यांच्या प्रतिकृतीच्या माध्यमांतून सादर केली.अशा प्रकारे Water Project मुळे जलचर प्राण्यांची ओळख, दैनंदिन जीवनातील पाण्याचे उपयोग, पाण्याचे स्त्रोत व जल प्रदुषणाची कारणे आणि आपण ते कसे रोखले पाहिजे याची माहिती मुलांना मिळाली.

Language Day साजरा करताना सर्व प्रथम नर्सरीमधील मुलांनी इंग्रजी मुळाक्षरांवरून प्रत्येकी तीन–तीन वस्तूंची चित्रासहीत नावे सांगितली. यामुळे त्यांचा शब्दसंग्रह वाढला. तसेच त्यांनी A ..B ..C .. या गाण्याचे सादरीकरण केले. ज्युनिअर के.जी.च्या विद्यार्थ्यांनी इंग्रजी बालगीते ताला–सुरात गायली व स्वत:बद्दलची आणि कुटुंबाची माहिती सादर केली. तसेच गोष्टीचे साभिनय सादरीकरण केले. सिनीअर के.जी.च्या मुलांनी Phonic Song सादर केले आणि त्याद्वारे त्यांनी प्रत्येक अक्षरांच्या योग्य उच्चाराची ओळख करून दिली. तसेच त्यांनी शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या संभाषणामधून स्वच्छता व योग्य आहाराचे महत्त्व विषद केले. Language Day उपक्रमातून मुलांच्या संभाषण कौशल्य आणि शब्दसंपत्ती मध्ये वाढ झाली व त्यांच्यात सभाधीटपणाही वृध्दिंगत झाला.



# क्रीडासंकुलात जिल्हास्तरीय शालेय मैदानी स्पर्धा



*जिल्हास्तरीय शालेय मैदानी स्पर्धा - क्षणचित्रे*

दि. ३ व ४ ऑक्टोबर २०१९ रोजी क्रीडासंकुलात जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धा संपन्न झाल्या. सदर स्पर्धेत चिपळूण, खेड, दापोली, मंडणगड, रत्नागिरी, लांजा, राजापूर, संगमेश्वर, गुहागर तालुक्यातील २५०० खेळाडूंनी सहभाग नोंदविला.

दोन दिवस सुरू असलेल्या या स्पर्धेत खेळाडूंनी उत्तमोत्तम कामगिरी केली. ही स्पर्धा १४ वर्ष, १७ वर्ष आणि १९ वर्ष वयोगटात मुले व मुली यामध्ये संपन्न झाली. सदर स्पर्धेमध्ये १७ वर्ष वयोगटात एस. व्ही. जे. सि. टी. इंग्लिश मिडियम स्कूलचा विद्यार्थी श्रेयस बोकडेने ४०० मीटर धावणे या स्पर्धेत ५६.८० सेकंद एवढी वेळ नोंदवून प्रथम क्रमांक मिळविला तसेच सावर्डे येथील विद्यार्थिनी साक्षी जड्याळ हिने ३००० मीटर धावणे या स्पर्धेत १०.२६.९२ मिनिटे एवढी वेळ नोंदवून तसेच २ मिनिटे राखून प्रथम क्रमांक नोंदविला. १४ वर्ष वयोगटात, उंच उडी प्रकारात मुलींमध्ये कोसबी येथील सानिका सावंत (१.२३ मीटर) हिला प्रथम, राजापूर येथील साठे विद्यालयातील शिवानी मांडवकर (१.२० मीटर) हिला द्वितीय, निधी शिगवण (१.२० मीटर) हिला तृतीय क्रमांक मिळाला. १९ वर्ष वयोगटात १०० मीटर प्रकारात मुलींमध्ये प्रथम क्रमांक गुहागर येथील जुई सोमण (१४.१३ सेकंद), द्वितीय क्रमांक ऋषिका कुळे (१४.३८ सेकंद), तृतीय कमांक तेजस्वी योलमकर (१४.६० सेकंद) यांनी मिळवला.

या स्पर्धेला रत्नागिरी जिल्हा क्रीडा कार्यालयाचे प्रतिनिधी, पंच, क्रीडा शिक्षक, पालक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र**
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : (०२३५५) २६४१४९ / २६४६३६ / २६४६३७ फॅक्स : (०२३५५) २६४१८१
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com





**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत ल. वालावलकर रुग्णालय, रोगनिदान आणि संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण**

## पुणे व मुंबई येथून नोव्हेंबर २०१९ मध्ये येणाऱ्या विविध तज्ज्ञ डॉक्टरांचे वेळापत्रक

| दिनांक | डॉक्टरांचे नांव | उपचार |
|---|---|---|
| दर शनिवारी | डॉ. सुनील नाडकर्णी, पुणे (एम.एस.ऑर्थो.) | अस्थिरोग तपासणी व दुर्बिणीद्वारे मणक्याची शस्त्रक्रिया |
| ९ नोव्हें. | श्रवण यंत्र व वाचा उच्चार तज्ज्ञ | श्रवण यंत्र व वाचा उपचार |
| १० नोव्हें. | डॉ. मंदार अक्कलकोटकर (आयुर्वेदिक), पुणे | तपासणी व आयुर्वेदिक उपचार |
| ११,१२ नोव्हें. | डॉ. सतेज सबनिस, युरॉलॉजिस्ट, मुंबई | मुतखड्यावरील दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया |
| १६ नोव्हें. | डॉ. रोहिणी सामंत, मुंबई (रुमॅटॉलॉजिस्ट), | संधिवात व सर्व वातविकारावर उपचार |
| १६ नोव्हें. | टाटा हॉस्पिटल डॉक्टर्स, मुंबई | कर्करोग शस्त्रक्रिया व उपचार |
| १६नोव्हें. | डॉ. श्रीपाद बाणावली, मुंबई (कर्करोग तज्ज्ञ) | कर्करोग तपासणी व उपचार |
| १६ नोव्हें. | डॉ. आनंद जोशी, (गॅस्ट्रोएंट्रोलॉजीस्ट), मुंबई | पचनसंस्थेवरील तपासणी व उपचार |
| १६ नोव्हें. | डॉ. सुजाता नाईक, मुंबई (होमिओपॅथीक) | त्वचारोग तज्ज्ञ |
| १७ नोव्हें. | डॉ. संजय ओक, मुंबई (सर्जन) | लहान मुलांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया |
| १७ नोव्हें. | डॉ. अमीत साहू (एम.डी.रेडीऑलॉजीस्ट ), मुंबई | इंटरव्हेंशनल रेडीऑलॉजी तपासणी व उपचार |
| २७ नोव्हें. | डॉ. उमा अली व डॉ. प्रिती शनभग, मुंबई | लहान मुलांचे किडनी विकार तपासणी व उपचार |
| ---- | डॉ. के. एस. कुलकर्णी, पुणे (मानसोपचार तज्ज्ञ) | मानसोपचार |
| ---- | डॉ. अच्युत जोशी, पुणे (नेफ्रोलॉजिस्ट) | किडनी विकार |

- **डॉ. सुनील नाडकर्णी दर शनिवारी दुपारी १.०० वाजेपर्यंत UHTC चिपळूण व त्यानंतर वालावलकर रुग्णालय येथे भेटतील.**
- **आर्थिकदृष्ट्या दुर्बल कर्णबधिरांना श्रवण यंत्र (कानाचे यंत्र) प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी मोफत मिळेल. यासाठी केशरी किंवा पिवळे रेशन कार्ड व त्याची झेरॉक्स आणणे आवश्यक आहे.**
- **प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी 'वाचा-उच्चार तज्ज्ञ' रुग्णालयात भेटतील.**

**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्री. विकासराव वालावलकर यांनी मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे-३० येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले. । Visit us at https://swamisamarth.com/dervan/
**संपादिका :** डॉ. सौ. सुवर्णा पाटील-९९२१२ ५१६९५, **संपादक मंडळ :** सौ. शरयू यशवंतराव-९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर-९५८८४ ७९२२०